मुख्य लेखा व वित्त विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक :- ४०७
दिनांक :- ६/५/२०२१

## कार्यालय परिपत्रक

विषय :- सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामधील तरतूदीच्या कपाती बाबत.
संदर्भ :- मा.स्थायी समिती ठ.क्र. १५३ दि. २०/०४/२०२१

सद्यस्थितीत कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचे प्रमाण कमी होत नसून त्यामध्ये दर दिवशी वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. दि.०१/४/२०२१ पासून पुणे शहरामध्ये सदर साथीच्या रोगाच्या नियंत्रणाकरिता अंशदायी लॉकडाऊन जाहीर केले असून सदर रोगाच्या नियंत्रणाकरिता वैद्यकिय उपचाराची साधने, नागरिकांसाठी मास्क खरेदी करणे, क्वारंटाईन केलेल्या नागरिकांना जेवण व इतर सर्व आवश्यक त्या सेवा/सुविधा पुरविणे, दवाखान्यांमध्ये विविध विद्युत विषयक कामे करणे, दवाखान्यांकरिता विविध यंत्रसामुग्री/उपकरणे खरेदी करणे, फर्निचर खरेदी करणे / तयार करणे, नविन हॉस्पिटल उभारणे, पोर्टेबल टॉयलेट व बाथरूम पुरविणे व तदनुषंगिक कामे करणे, वाहतूक व्यवस्था करणे व तद्नुषंगिक खर्च तसेच पुणे मध्ये उभारण्यात आलेल्या जंम्बो हॉस्पिटलबाबत होणार खर्च इ. उपाययोजनांचे खर्चासाठी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात तरतूदीची आवश्यकता असल्याने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये भांडवली कामांसाठी केलेल्या तरतूदीतून मा.स्थायी समिती ठ.क्र. १५३ दि. २०/०४/२०२१ अन्वये १०% सरसकट कपात करणेबाबत ठराव मान्य करण्यात आलेला आहे.

तरी, सर्व खातेप्रमुख/उप आयुक्त/सहाय्यक महापालिका आयुक्त यांनी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची अंमलबजावणी करताना उदा. विविध विकास कामांच्या जाहिरात देणे, टेंडर लावणे, वर्कऑर्डर देणे, बिले तयार करणे इ. तयार करताना वरील बाबीची पूर्तता करुनच पुढील प्रक्रिया करण्यात यावी.

मा. स. कळावे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पुणे महानगरपालिका